प्रेसनोट

दि.१८/०८/२०२१

## पिंपरी चिंचवड महानगर पालिकेतील स्थायी समितीचे सभापती, तीन लिपिक व शिपायावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | पिंपरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २४ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय लोकसेवक | १) ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगर पालीका.<br>२) ज्ञानेश्वर किसनराव पिंगळे, पद - मुख्य लिपिक (स्थायी सभापतीचे स्वीय सहायक) पिंपरी चिंचवड महानगर पालीका.<br>३) विजय शंभुलाल चावरिया, पद - लिपिक, पिंपरी चिंचवड महानगरपालीका.<br>४) राजेंद्र जयवंतराव शिंदे, पद - संगणक चालक, पिंपरी चिंचवड महानगर पालीका.<br>५) अरविंद भिमराव कांबळे, पद - शिपाई. पिंपरी चिंचवड महानगर पालीका. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | सुरूवातीस १० लाख रूपये, तडजोडीअंती ६ लाख रूपये. |
| पैकी स्वीकारलेली लाच रक्कम | १,१८,०००/- (एक लाख अठरा हजार रूपये) |

थोडक्यात माहिती.

पडताळणी :- दिनांक १३/०८/२०२१ व दिनांक १७/०८/२०२१

सापळा दिनांक :- दिनांक १८/०८/२०२१.

हकिकत :- यातील तक्रारदार हे जाहिरातीचा व्यवसाय करत असून पिंपरी चिंचवड महानगरपालीकेच्या जागेमध्ये होर्डींग उभारण्याकरीता तयांनी भरलेल्या २८ निविदा मंजुर झालेल्या आहेत. परंतु त्यांची वर्कऑर्डर अद्याप न निघाल्याने तक्रारदार हे स्थायी समितीचे सभापती ॲडव्होकेट नितीन ज्ञानेश्वर लांडगे व त्यांचे स्वीय सहायक ज्ञानेश्वर पिंगळे यांना भेटले असता वर्क ऑर्डर मिळविण्यासाठीच्या करारनाम्यावर सही करण्यासाठी त्या २८ निविदांच्या बोली रक्कमेच्या (बीड अमाऊंट) ३ टक्के रक्कम १० लाख रूपये लाचेची मागणी केली.तडजोडीअंती २ टक्केप्रमाणे सहा लाख रूपये घेण्याचे मान्य केले व ६ लाख रूपयांची मागणी करून त्यापैकी आजरोजी तयार असलेल्या ६ करारनाम्यांच्या फाईल्सवर सही शिक्का देण्याकरीता २ टक्क्याप्रमाणे १ लाख १८ हजार लाच रक्कमेची मागणी करून ती तेथील लिपिक - विजय चावरिया, संगणक चालक - राजेंद्र शिंदे व शिपाई - अरविंद कांबळे यांचेमार्फत स्वीकारल्यावर या सर्वांना ताब्यात घेण्यात आले असून पिंपरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. तपास पोलीस उपअधीक्षक सीमा मेहेंदळे, ला.प्र.वि. पुणे या करत आहेत.

सदरची कारवाई पथक (ला.प्र.वि. पुणे युनिट) -

१) पोलीस उपअधीक्षक श्रीमती सीमा मेहेंदळे, २) पोलीस उपअधीक्षक श्रीहरी पाटील.
३) पोलीस निरीक्षक श्री. गिरीष सोनवणे ४) पोलीस हवालदार श्रीमती सरिता वेताळ
५) पोलीस हवालदार अश्पाक इनामदार ६) पोलीस हवालदार अंकुश माने.
७) पोलीस नाईक - अविनाश इंगुळकर ८) पोलीस शिपाई - चंद्रकांत कदम

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहा.पोलीस आयुक्त /पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,पुणे